# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः12.12.2025** **वारःशुक्रवार**

1. राष्ट्रपती मुर्मू यांच्या हस्ते इम्फाळमध्ये 1300 कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी.
2. सहा राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधील मतदार यादीच्या विशेष सघन पुनरीक्षण वेळापत्रकात सुधारणा.
3. राज्यसभेत वंदेमातरम गीताच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवावरील चर्चेचा समारोप.
4. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि देशाचे माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच निधन आणि
5. वीस षटकांच्या दुसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा भारतावर विजय.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल संध्याकाळी इम्फाळमधील सिटी कन्व्हेन्शन सेंटरमध्ये झालेल्या समारंभात 1 हजार 3 शे 87 कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचं भूमीपूजन आणि उद्घाटन केलं. राष्ट्रपती कालपासून मणिपूरच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. याप्रसंगी आपल्या भाषणात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या की उद्घाटन झालेल्या या प्रकल्पांमुळं रोजगार निर्माण होईल, पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होईल आणि आर्थिक उपक्रमांना गती मिळेल. मणिपूरच्या समावेशक विकासासाठी आणि राज्यातील लोकांच्या सक्षमीकरणाकरिता सरकारची वचनबद्धता या प्रकल्पांमधून प्रतिबिंबित होतं असंही त्या म्हणाल्या.

मणिपूरच्या लोकांना दुर्दैवी हिंसाचारानंतर झालेल्या वेदनांबद्दल दुःख व्यक्त करताना, राष्ट्रपती म्हणाल्या की सरकार प्रत्येक बाधित कुटुंबासोबत उभं आहे आणि मणिपूरच्या लोकांना वाटत असलेल्या चिंतांची काळजी घेणं ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता आहे असं आश्वासन त्यांनी दिलं.

**मतदार**

भारतीय निवडणूक आयोगानं सहा राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सुरू असलेल्या मतदार यादीच्या विशेष सघन पुनरीक्षणाच्या वेळापत्रकात सुधारणा केली आहे. आकाशवाणीच्या प्रतिनिधीनं दिलेल्या वृत्तानुसार यामध्ये तमिळनाडु, गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड, अंदमान आणि निकोबार बेटे आणि उत्तरप्रदेश यांचा समावेश आहे. ही राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी मसुदा मतदार यादी या महिन्याच्या 16 तारखेला प्रकाशित केली जाईल. 6 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडून विनंती मिळाल्यानंतर वेळापत्रकात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला असं आयोगानं स्पष्ट केलं आहे.

**संसद कामकाज**

राज्यसभेत काल 'वंदे मातरम' या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त सुरू असलेल्या चर्चेचा समारोप सभागृह नेते जे.पी. नड्डा यांनी केला. 'वंदे मातरम' हा देशाचा आत्मा जागृत करण्याचा मंत्र आणि देशाच्या पुनर्निर्माणाचं आवाहन आहे, असं प्रतिपादन त्यांनी केलं. या चर्चेत 80 पेक्षा जास्त खासदारांनी भाग घेतला. यावेळी बोलताना नड्डा म्हणाले...

**जब हम वंदे मातरम की बात करते हैं तो हम ये मानते है की ये देश की आत्मा को जगाने का मंत्र है हम ये मानते है की ये राष्ट्र का पुनर्जागरण है और हम ये भी मानते है की ये राष्ट्र के पुनर्निर्माण का एक तरीके से आहवान है और इसलिए ये मंत्र हम सब लोगों को प्रेरित भी करता है और हमारे को अपनी संस्कृति से जोड़ने का सुअसर भी देता है।और उसके लिए प्रेरणा भी देता है। आजादी की लड़ाई में इसने ऊर्जा का काम किया है वंदे मातरम एक मंत्र है एक ऊर्जा है एक प्रण है एक संकल्प है।**

लोकसभेत काल ऊर्जानिर्मिती आणि वापराबाबत चर्चा झाली. भारतात ऊर्जेचा वापर वेगानं वाढत असून येत्या 20 वर्षांत जागतिक पातळीवर ऊर्जेच्या वाढत्या मागणीत 35 टक्के वाटा भारताचा असेल, असा अंदाज आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेनं वर्तवला असल्याची माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी काल लोकसभेत पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. तर, पेट्रोलमध्ये 20 टक्के इथेनॉलचं मिश्रण केल्यानं भारताचं कार्बन उत्सर्जन 736 लाख मेट्रिक टनांनी कमी झाल्याची माहिती रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी लोकसभेत दिली.

**भारतीय-भाषा**

महाकवी सुब्रमण्यम भारती यांच्या जयंतीनिमित्त काल नवी दिल्लीत भारतीय भाषा उत्सव आयोजित करण्यात आला होता. देशाच्या समृद्ध भाषिक विविधतेचा उत्सव साजरा करण्यासाठी, शिक्षण मंत्रालयानं अनेक भाषा, एक भावना या संकल्पनेच्या अंतर्गत हा कार्यक्रम आयोजित केला होता. आदिवासी व्यवहार मंत्रालयानंही या उत्सवात भाग घेतला. विविध आदिवासी भाषांची सखोलता, त्यातील चैतन्य आणि त्यांचं सांस्कृतिक महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आलं. या उत्सवाचा एक भाग म्हणून मंत्रालयानं झारखंड, ओडिशा आणि गुजरातच्या आदिवासी संशोधन संस्थांमधील आदिवासी भाषा प्रकाशनांचं एक दालन उभारलं होतं. या दालनामध्ये हिंदी किंवा इंग्रजी आणि आदिवासी भाषांमध्ये वास्तविक वेळेत मजकूर आणि भाषणांचं भाषांतर सक्षम करण्यासाठी डिझाइन केलेल्या आदिवाणी या ॲपचं प्रात्यक्षिकदेखील दाखवण्यात आलं. या कार्यक्रमात देशातील विविध प्रदेशांचं प्रतिनिधित्व करणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमही सादर केले.

**ट्रंप-मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. याबाबत माहिती देताना समाज माध्यमांवरील एका संदेशात मोदी यांनी सांगितलं की, दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संबंधांमधील प्रगतीचा आढावा घेतला आणि प्रादेशिक तसंच आंतरराष्ट्रीय घडामोडींवर चर्चा केली. भारत आणि अमेरिका जागतिक शांतता, स्थिरता आणि समृद्धीसाठी एकत्र काम करत राहतील असा विश्वासही मोदी यांनी व्यक्त केला.

**नेपाळ-जेन झेड**

नेपाळमध्ये काठमांडू इथं झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सरकार आणि जेन झेड प्रतिनिधींच्या दरम्यान 10 कलमी कराराला मान्यता देण्यात आली आणि त्याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. पंतप्रधान कार्यालयातील सिंह दरबारात या करारावर स्वाक्षरी करण्यात आली. जेन झेड चळवळीदरम्यान मृत आणि जखमी झालेल्यांच्यावतीनं पंतप्रधान सुशीला कार्की आणि भोज बिक्रम थापा यांनी या करारावर स्वाक्षरी केली.

**भारतीय-परदेशी**

परदेशात असलेल्या भारतीय कामगारांच्या सुरक्षिततेला, सुरक्षिततेला आणि कल्याणाला भारत सर्वोच्च प्राधान्य देत असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. भारतीय कामगारांसहित भारतीय नागरिकांकडून कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यावर, भारतीय दूतावास संबंधित परदेशी नियोक्त्याकडं ती पाठवतो आणि दूतावासाचे कर्मचारी पीडित कामगाराच्या कामाच्या ठिकाणीदेखील पोहोचतात. परराष्ट्र राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांनी राज्यसभेत काल एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात ही माहिती दिली. भारतीय कामगारांना मार्गदर्शन आणि समुपदेशन देण्यासाठी नवी दिल्ली, दुबई, रियाध, जेद्दाह आणि क्वालालंपूर यासारख्या प्रमुख ठिकाणी प्रवासी भारतीय सहायता केंद्र स्थापन करण्यात आलं आहे. परदेशातील भारतीय दूतावास अशा भागात राहणाऱ्या भारतीय कामगारांकडून अभिप्राय मिळविण्यासाठी आणि त्यांच्या तक्रारींचं निराकरण करण्यासाठी नियमितपणे दुर्गम भागात ओपन हाऊस आणि कॉन्सुलर शिबीरं आयोजित करतात असंही मंत्र्यांनी सांगितलं.

**डॉक्टर-कोविड**

कोविड-19 मधील कर्तव्य बजावताना मृत्युमुखी पडलेल्या डॉक्टरांच्या कुटुंबियांना प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेअंतर्गत 50 लाख रुपयांचा विमा मिळण्याचा अधिकार आहे, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयानं काल दिला आणि खासगी डॉक्टरांना वगळण्याचा मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय रद्दबातल ठरवला. न्यायमूर्ती पी.एस.नरसिंह आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठानं सांगितलं की, साथीच्या रोगावरील नियम आणि अधिकृत आदेशांवरून स्पष्टपणे दिसून येतं की डॉक्टरांच्या सेवांची मागणी करण्यात आली होती आणि विमा योजना

ही आघाडीवरील कर्मचाऱ्यांना देश त्यांच्या पाठीशी उभा आहे याची खात्री देण्यासाठी होती. कोविड-19 मधील कर्तव्य बजावताना डॉक्टरांचा मृत्यू झाल्याचं सिद्ध करण्याची जबाबदारी दावेदारावर असेल, असंही न्यायालयानं म्हटलं आहे. 2020 मध्ये ठाण्यातील एका खासगी डॉक्टरांचा मृत्यू झाल्यानंतर दाखल केलेल्या याचिकेवर हा आदेश देताना त्याच्या कुटुंबाचा दावा फेटाळण्यात आला. या डॉक्टरांचे क्लिनिक मान्यताप्राप्त कोविड-19 रुग्णालय नव्हते असं निरीक्षण न्यायालयानं नोंदवलं.

**गोवा क्लब आग**

गोवा नाइट क्लब आग प्रकरणातले आरोपी आणि क्लबचे भागीदारसौरभ लुथरा आणि गौरव लुथरा या दोघांना थायलंड पोलिसांनी ताब्यात घेतलं. गोव्यातल्या अरपोरा इथल्या क्लबमध्ये गेल्या शनिवारी आग लागून 25 जणांचा मृत्यूझाला होता, त्यानंतर लुथरा बंधू थायलंडला पळून गेले होते. त्यांच्या विरोधात इंटरपोलनं 'ब्लू कॉर्नर नोटिस' जारी केली होती.

**निधन**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि देशाचे माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे आज लातूर येथे दीर्घ आजारपणामुळे निधन झाले. ते 91 वर्षांचे होते. शिवराज पाटील चाकूरकर हे लोकसभेचे सभापती आणि विविध केंद्रीय मंत्रीपदांवर कार्यरत होते. त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत देशासाठी अनेक प्रतिष्ठित पदे भूषवली आणि त्यांनी देशातील संवैधानिक प्रक्रियेत सक्रिय भूमिका बजावली होती. शिवराज पाटील-चाकूरकर यांनी लातूर लोकसभा मतदारसंघातून सात वेळा विजय मिळवला होता. काँग्रेस आणि त्यांच्या संघटनेतील वरिष्ठ नेते आणि कार्यकर्त्यांनी त्यांच्या निधनावर दुःख व्यक्त केलं आहे.

**क्रिकेट**

चंदीगड इथं काल झालेल्या वीस षटकांच्या दुसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं भारतावर 51 धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना पाहुण्यांच्या 4 बाद 213 धावा झाल्या. उत्तरादाखल भारतीय संघ सर्वबाद 162 धावाच करु शकला. पाच सामन्यांच्या या मालिकेत आता दोन्ही संघांची 1-1 अशी बरोबरी झाली आहे. तिसरा सामना येत्या 14 डिसेंबरला धरमशाला इथं होणार आहे.

दरम्यान आशियाई क्रिकेट परिषदेच्या 19 वर्षांखालील आशिया कप 2025 ला आज दुबईमध्ये सुरू होत आहे. आयुष म्हात्रे याच्या नेतृत्वाखालील भारत आणि यजमान संयुक्त अरब अमिराती यांच्यात आज सामना होणार आहे. भारतीय वेळेनुसार हा सामना सकाळी साडेदाह वाजता सुरू होईल. तर येत्या रविवारी भारताचा सामना पाकिस्तानशी होणार आहे.

**हवामान**

महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये आजही थंडीची लाट राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. पारा 8 ते 10 अंश सेल्सियसच्या आसपास आहे. पुण्यामध्ये किमान तापमान 7 अंश सेल्सियसपर्यंत घसरलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.